Dr. R.N. Sawant


# INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISIPLINARY STUDIES


MONTHLY DOUBLE-BLIND PEER REVIEWED REFERRED OPEN ACCESS INTERNATIONAL JOURNAL

www.irjms.in

E-mail: irjms2015@gmail.com irjms.in@gmail.com

VOL-7, ISSUE- II ISSN : 2454-8499 FEBRUARY -2022

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES

IRJMS


Executive Editor
Prof. Tanaji Jadhav

Chief Editor
Dr. Mahendra Avaghade

# INDEX


| Sr. No. | Title of the Paper | Name of the Author | Country/ State/City | Page No. |
|---|---|---|---|---|
| 1 | The Pleasure Principle of Epicurean School of Philosophy | Shantaraj Debbarma | Tripura | 1 |
| 2 | Impact of COVID-19 lockdown on Indian economy and the power sector | Dr. Landge Balwant Bhimrao | Pune | 7 |
| 3 | समाज के नवनिर्माण में भाषा और साहित्य की भूमिका | डॉ. सिद्धेश्वर वि. गायकवाड | पुणे | 13 |
| 4 | पश्चिम महाराष्ट्रातात प्राथमिक शेती सहकारी पतसंस्थांच्या प्रादेशिक भिन्नतेचे आणि आर्थिक कामगिरीचे मूल्यांकन: अल्प मुदतीच्या सहकारी पत संरचनेचा विशेष संदर्भ | **प्रीती ए.दीक्षित, प्रा. ए. आर. मुंगी, प्रा. ए. वाय. दीक्षित** | पुणे | 17 |
| 5 | What is the importance of Education in Indian Politics? | Dr. B.L Rathod | Pune | 29 |
| 6 | Companies Act 2013: A Move towards Transparency | Dr. N.S. Giri | Pune | 32 |
| 7 | An Ayurveda view to manage a case of secondary amenorrhoea due to hypoplastic uterus | Dr. sapna R waghmare, Dr. Jayashree K. Saraf, Dr. Praveen K. Banmeru | Sangamner | 35 |
| 8 | As India STANDS – STILL,The Sweepers' Community STILL – STANDS to Collect Garbage. (An Empirical study of the Physical & Mental Well-Being of the Housing Society Sweepers' Community in Pune City, during the Period of Lockdown) | Dr. Mrs. Shilpi A.Lokre | Pune | 39 |
| 9 | Issues and Challenges of Women Entrepreneurship in India | Dr. Neeta B. Kamble | Pune | 58 |
| 10 | Globalization and India's International Trade | Dr. R.P. Kuchekar | Pune | 63 |
| 11 | A Case Study on administration of Effluent Treatment of Electroplating Industry in Pune region | Shruti Shah | Pune | 67 |
| 12 | Role of Aasitakadichurna in the management of Gridhrasi ( sciatica ) | Vd. Nita D. Rajput, Vd. P.B. Yawatkar | Rahuri. | 71 |
| 13 | डॉ. गौतम बेंगाळे : प्रबोधन पर्वातील प्रगल्भ नेता | **संजय साळवे** | **पुणे** | 74 |
| 14 | DIGITALIZATION OF LINGUISTIC INTERACTION IN BUSINESS | Mr. Govind C. Kamble | Pune | 81 |
| 15 | पुणे शहरातील व्यावसायिक आणि रोजगारीत महिलांच्या समस्यांचा अभ्यास. | डॉ. रजनी ना. सावंत | मालेगाव कॅम्प | 85 |
| 16 | Role of Business Education in Development of New Age Business Leaders | Dr. Anand Suryabhan Kore, Dr. M. G. Mulla | Pune | 91 |

# पुणे शहरातील व्यावसायिक आणि रोजगारीत महिलांच्या समस्यांचा अभ्यास.

**डॉ. रजनी ना. सावंत**
अर्थशास्त्र विभाग,
महिलारत्न पुष्पाताई हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महिला महाविद्यालय,
मालेगाव कॅम्प,

**प्रस्तावना :**

भारतीय शिक्षण संस्था आणि नियोजन आयोग, भारत सरकार, 'मध्ये महिला पदवीधारकां मधील बेरोजगारी'. -पुणे सिटी', ऑक्टोबर 2002 यांनी उद्योजक महिलांचे तीन वर्गात वर्गीकरण केले आहे. ज्या महिला स्वतःच्या विकासासाठी नोकरी करतात तसेच त्या बरोबर व्यवसाय देखील करतात त्यांचा उद्देश फक्त जीवनमान उंचावणे किंवा आर्थिक परिस्थिती आणखी बळकट करणे असा असतो या महिलामुळात आर्थिक दृष्ट्या सक्षम असतात. आणि त्यांच्या संघटना देखील तेवढ्याच मजबूत असल्या मुळे सर्वसमस्यांचा सामना त्या करू शकतात. दुसरा गट म्हणजे विविध सेवा क्षेत्रात असणाऱ्या महिला होत. ह्या गटातील कामकरणाऱ्या महिलांना बंदिस्त सुरक्षित क्षेत्र म्हणून गणले जाते. यांच्या देखील संघटना मजबूत असतात. या महिलांना नियमित वेतन सुद्धा मिळते आणि त्या मुळे रोजगाराती सुरक्षितता सुद्धा त्या अनुभवत असतात शिवाय त्यांच्या संघटना सुद्धा मजबूत असतात. पूर्णतः अडाणी किंवा कमी शिकलेल्या महिलांचा तिसऱ्या गटात समावेश होतो. किरकोळ विक्री खाद्य पदार्थ तयार करणे शिवणकाम इत्यादी प्रकारची कामे या महिला करतात. या महिलांना अकुशल कामगार म्हणून संबोधले जाते. त्या मुळे त्यांना किमान वेतन हे देखील कठीण होऊन बसते. शिवाय या महिला असंघटित असतात , त्या मुळे त्यांची पिळवणूक होताना दिसते अशा पुणे शहरातील तीनही गटातील व्यावसायिक आणि रोजगारीत महिलांच्या समस्यांचा या प्रकरणां मध्ये विचार केला आहे.

**सुरक्षित वेतन मिळवणाऱ्या महिलांच्या समस्या:-**

सुरक्षित वेतन कमावणाऱ्या महिला त्यांची नोकरी आणि व्यवसाय यात त्या कसा ताळमेळ साधतात आणि त्या बाबत त्यांना त्यांच्या घरून तसेच नोकरीच्या ठिकाणी कसे पाठबळ मिळतेया बाबत मराठा चेंबर ऑफ कॉमर्स पुणे यांनी बरीच चर्चासत्रे आयोजित केली. या अभ्यासा नुसार असे जाणवले की :-

८० टक्के महिलांना घरचे आणि घरच्यांची जबाबदारी घ्यावीच लागते. घरच्यांचे पाठबळ असेल तर त्यांना नोकरी करणे शक्यच नसते. त्यामुळे नोकरी किंवा व्यवसायात प्रगतीकरायची असेल तर घरचे पाठबळ असणे

अत्यावश्यक असते. ६० टक्के महिलांचे असे म्हणणे पडले की त्यांना कामाच्या ठिकाणी त्यांना पुरुषांचा पाठिंबा देखील मिळतो परंतु कामाच्या ठिकाणी महिला उशिरा पर्यंत वेळ थांबू शकत नाही हे पुरुषांच्या दृष्टीने स्त्रियांची दुर्बलता असते.

कामाच्या वेळा मुळे त्यांना स्वतःची मुले आजू बाजूला किंवा नातेवाइकांकडे ठेवणे भाग पडते. १८ टक्के महिलांनी असे मत व्यक्त केले की त्यांची मुले पालक परत येई पर्यंत स्वतःच स्वतःची काळजी घेतात.
महिलांच्या आरोग्य विषयक समस्यांमध्ये प्रचंड वाढत आहे याचे मुख्य कारण म्हणजे त्यांना नोकरी आणि घरची कर्तव्ये अशी दुहेरी जबाबदारी पार पाडावी लागते . डोकेदुखी ,पाठदुखी, कंबरदुखी , रक्तदाब ,पुरेसे पाणी न प्यायल्यामुळे मूत्र पिंडामध्ये मध्ये होणारे स्टोन , दमा, पित्ताशयाचे आजार , पांढऱ्या पेशी वाढणे ,पाय व सांधेदुखी अशा अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.

'सेंटर फॅार वर्क' लाइफ या संघटनेने केलेल्या पाहणीनुसार दरवर्षी ७७ लाख स्त्रिया नोकरी - व्यवसायात येतात . नोकरी व्यवसाय आणि कौटुंबिक जबाबदारी या दोन्हींचा त्या मेळ घालत असतात. भारतीय परंपरेनुसार या महिलां कडून कौटुंबिक जबाबदारीची अपेक्षाही जरा जास्तच प्रमाणात असते त्यामुळे हा स्त्रियांना नोकरीच्या ठिकाणची जबाबदारी पार पाडणे कठीण होऊन बसते.

'महिलांना रोजगार बाजारपेठेत वाव असलातरी 'मराठा चेंबर ऑफ कॉमर्सच्या ' आकडेवारीनुसार कंपन्यांमध्ये आजही उच्च पदस्थांमधे पुरुषांचीच संख्या जास्त आहे.

- महिलांना नोकरी व कुटुंब या दोन्ही गोष्टींचा मेळ साधायचा असल्यामुळे त्या नोकरीच्या ठिकाणी मर्यादित वेळच देऊ शकतात.
- पुरुषांना महिला बॉसचा आदर करण्यात कमीपणा वाटतो.
- महिला बॉसना इतर कमी लेखतात यामुळे त्यांना इतरांचे टोमणे ऐकावे लागतात.
- आपली क्षमता सिद्ध करण्याकरता त्यांना अधिक कामे करावी लागतात.
- दवाखान्यामध्ये काम करणाऱ्या महिलांना रात्रपाळी करावी लागते. अशावेळी महिला स्वतःच्या वाहनाने प्रवास करतात , परंतु स्वतः च्या वाहनाची सोय नसलेल्या महिलांना बऱ्याच समस्यांना सामोरे जावे लागते.

- स्वतंत्र व्यवसाय असणाऱ्या ज्यांची स्वत:ची कार्यालये असतात त्यांना स्वत:चे स्टाफ मेम्बर्स कडून देखील त्रास सहन करावा लागतो.

**आयटी क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या महिलांना भेडसावणाऱ्या समस्या:-**

- आयटी क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या 25 ते 35 वर्षे वयोगटातील महिलांसाठी या संस्थेने एक कार्यशाळा आयोजित केली होती . यातील बहुतांश महिला उच्चशिक्षित होत्या . या महिला कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडण्याकरता इतर सदस्यांची मदत घेतात. पती-पत्नी उच्चपदावर काम करत असल्यामुळे घरचे सुद्धा त्यांच्या घरगुती जबाबदारयांना हातभार लावतात. या अहवालातील माहितीनुसार असे लक्षात आले की यातील काही महिला घरची सुद्धा पूर्ण जबाबदारी पार पाडतात.
- ह्या महिला आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी असल्यामुळे त्यांना स्वत:चे पैसे वापरण्याकरता परवानगी घेण्याची गरज भासत नाही. शक्यतो घरातील आर्थिक निर्णय हे घरातील ज्येष्ठ मंडळी घेत असले तरी आयटी क्षेत्रातील महिलांच्या बाबतीत असे दिसून येत नाही.
- चर्चासत्रात आलेल्या 70 टक्के महिलांनी त्यांना सार्वजनिक वाहनांचा प्रवास सुरक्षित वाटत नाही असे सांगितले . फक्त दोन टक्के महिलांनी फक्त प्रवास सुरक्षित असतो असे सांगितले ,तर एक टक्के महिलांच्या मते बसचा प्रवास त्यांना सुरक्षित वाटतो. बस स्टॉपची परिस्थिती सुद्धा चिंताजनक आहे असे बऱ्याच महिलांनी सांगितले . तरीसुद्धा एक टक्के महिलांनी बसस्टॉप वरील परिस्थिती चांगली असते असे मत मांडले. 75 टक्के महिलांनी बसस्टॉप वरील परिस्थिती चांगली नसते असे मत मांडले, तरीसुद्धा एक टक्के महिलांनी परिस्थिती फक्त काही वेळा चांगली नसते असे सांगितले. नोकरीच्या ठिकाणी सुद्धा पुरुषांपेक्षा स्त्रियांनाच जास्त समस्यांना तोंड द्यावे लागते .
- सत्तर टक्के महिलांनी त्यांना कोणतीही आरोग्याची समस्या जाणवत नाही असे सांगितले . परंतु 30 टक्के महिलांनी असे सांगितले की त्यांना काय अनेक आरोग्य विषयक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. बहुतेक महिलांना छंद आहेत पण ते जोपासण्यासाठी सुद्धा त्यांना क्वचितच वेळ मिळतो.
- बऱ्याच आयटी कंपन्या आपल्या कर्मचाऱ्यांसाठी वाहतूक व्यवस्था पुरवतात परंतु ती सुद्धा अपुरी असते. त्यामुळे महिलांना खासगी वाहनांवर अवलंबून राहावे लागते.

- विशेषत हिंजेवाडी सारख्या न वाढलेल्या ठिकाणी, सध्याकाळी सहानंतर वाहन मिळणे कठीण होऊन बसते. खाजगी वाहन परवडणारे आहे हे माहित असून देखील तो पर्याय स्वीकारावा लागतो
- अनेक कंपन्यांच्या बसेस रात्रीच्या वेळी धावत असतात परंतु त्या महिलांसाठी थांबत नाहीत. शिवाय कंपन्यांनी पुरवलेल्या बसे साठी वाहन भत्ता कापून घेतात. तेही कामगारांना परवडण्यासारखे नसते.

**पुणे शहरातील महिला उद्योजकांना भेडसावणाऱ्या समस्या:-**

या समस्या जाणून घेण्यासाठी मराठा चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ऍग्रिकल्चर च्या महिला उद्योजक समितीच्या सहयोगी संचालिका श्रीमती मेधा कुलकर्णी यांचे विचार जाणून घेतले ते खालील प्रमाणे.

**लघु उद्योगात कार्यरत असणाऱ्या महिलांना भेडसावणाऱ्या समस्या:-**

- एखादा व्यवसाय सुरू करताना कोणकोणत्या कायदेशीर बाबींची पूर्तता करावी लागते याची कल्पना या घरगुती महिलांना नसते . उदाहरणार्थ , या उद्योगासंबंधीचे कायदे , सबसिडी कुठून मिळते, कर कोठे भरावा लागतो ,विविध संघटनांची , विविध सरकारी खात्यांची कोणाकोणाची परवानगी लागते या बाबतची सुद्धा कल्पना नसते . या सर्व बाबींची एकात ठिकाणी माहिती मिळण्याची अशी सोय कुठेही नाही.
- कुटुंब आणि व्यवसाय दोन्ही जबाबदारी पार पाडत असताना दोन्हीं मध्ये वेळेचे व्यवस्थापन साधताना त्यांची तारेवरची कसरत होते अशावेळी त्यांना विशिष्ट पद्धतीने दोन्ही कडे काही प्रमाणात त्याग करावा लागतो.
- कुटुंबाची आर्थिक बाजू पुरुष सांभाळत असल्यामुळे त्यांना आर्थिक व्यवहारांत बद्दल काही ही कल्पना नसते आणि अचानक त्यांच्यावर व्यवसायाची आर्थिक बाजू सांभाळण्याची जबाबदारी पडते. अशावेळी व्यवसायाचा जमा खर्चाचा बाबी सांभाळणे त्यांना अवघड होऊन बसते.
- व्यवसाया बाबतची मार्केटमधील स्थिती काय आहे त्याबद्दल त्यांना काहीही माहिती नसते.
- कुटुंब आणि व्यवसाय या दोन्ही चा समतोल साधत असताना व्यवसायामध्ये जर एखाद्या स्त्रीने भरारी घेतली तर स्त्रिया समाजाकडून पालक किंवा पत्नी म्हणून अपयशी ठरली आहे असा तिच्यावर शिक्कामोर्तब केला जातो .

**घरी बसून एखादा व्यवसाय करणाऱ्या महिलांना भेडसावणाऱ्या समस्या:-**

- भारतात हा सर्वात मोठा कमकुवत आर्थिक परिस्थिती असलेल्या महिलांना पुढील आ वासून उभा असलेला प्रश्न आहे त्यांची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्यामुळे त्यांना कुठल्याही बँका किंवा नातेवाईक सुद्धा भांडवलाची मदत करत नाहीत.
- अनुभव हा अभावी कोणत्या पद्धतीचा उद्योग सुरू करावयाचा विचार करण्यास असमर्थ असतात. साधारणत: मध्यमवर्गीय महिलांकडे थोडे फार भांडवल असते परंतु ज्ञान व अनुभवाच्या अभावी उद्योग सुरू करण्याकरिता कोणकोणत्या बाबींची पूर्तता करावी लागेल याचा अनुभव नसतो.
- महिलांना जेव्हा भांडवल आणि वेळेची गुंतवणूक करावयाची असते तेव्हा त्यांना घरातील सदस्यांचा आधार घ्यावा लागतो व त्यांचा पाठिंबा नसल्यास उद्योग वाढवायचा असला तरीसुद्धा त्यामध्ये त्या असमर्थ ठरतात
- साधारणता केटरिंग शिवणीकासाड्या विकणे इत्यादी व्यवसाय या महिला सुरू करतात . मात्र या व्यवसायांना देखील बाजारामध्ये मुळातच भरपूर स्पर्धा आहे ,त्यामुळे काही कालावधी नंतर हा सुद्धा व्यवसाय त्यांना बंद करण्याची वेळ येते.
- बऱ्याच महिला लोणची पापड सारख्या असे व्यवसाय करतात , परंतु त्यांचे पॅकिंग नीट नसल्यामुळे आणी ते विकण्याची नीट व्यवस्था नसल्यामुळे त्यांचा व्यवहार पुढे दीर्घकाळापर्यंत टिकून राहण्यास समस्या निर्माण होते .

**महिला व्यावसायिकांना सक्षम कसे करता येईल त्याबाबतचे उपाय:-**

- उद्योग उद्योग सुरू करण्या बाबतची माहिती मार्गदर्शन केंद्र उपलब्ध करून देणे आवश्यक आहे शक्ति मान्यता व्यवसायाची नोंदणी कशी करावी , कोणकोणते कर भरावे लागतील , कोठे भरावे लागतील, व्यवसाया बद्दलचे कायदे नियम , विक्रेत्यांचे व्यवस्थापन कसे करता येईल ,कच्च्या मालाची खरेदी कोठून करावी लागेल तसेच व्यवसायाचा जमा खर्च कसा ठेवता येईल याबाबतचे ज्ञान मार्गदर्शन केंद्रामध्ये उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.
- त्यांच्या व्यवसायामध्ये त्यांना प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांची आवश्यकता आहे .

- लघुउद्योगांच्या बाबतीत दर्जा आणि पॅकेजिंग बाबतचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.
- शहरात उद्योग व्यवसाय करणाऱ्या महिलांसाठी वसतिगृहांची सोय असावी .
- व्यवसायाच्या ठिकाणी जवळपास शौचालये असावीत .
- बार कोडींग पेटंट आणि चिन्हांकनबाबत ची माहिती असावी .
- शासकीय महापालिका योजनांची माहिती द्यावी .
- महिलांना उद्योग करण्यासाठी राखीव भूखंड असावेत .
- महिला उद्योजकांच्या व्यवसायाला विशिष्ट सवलती असाव्यात .
- महिलांना रोजगारात स्थान देणाऱ्या उद्योगांनी 50 टक्क्या पेक्षा जास्त महिलांना रोजगारामध्ये स्थान दिल्यास त्यांना सवलत असावी .
- महिलांसाठी खास बसेसची व्यवस्था असावी आणि बस थांब्यावर लख्ख प्रकाश असावा .
- औद्योगिक क्षेत्रात केव्हा शॉपिंग कॉम्प्लेक्स येथे देखील भरपूर प्रकाश असणे आवश्यक आहे .
- औद्योगिक क्षेत्रात म्हणजे म्हणून काम करणाऱ्या महिलांसाठी कोणाच्या ठिकाणाच्या जवळ त्यांच्या लहान मुलांची काळजी घेणारी केंद्र असावित .

**संदर्भ :-**


१) *भारतीय शिक्षण संस्था आणि नियोजन आयोग , भारत सरकार , 'महिला पदवी धारकांमधील बेरोजगारी . पुणे सिटी ', ऑक्टोबर 2002.*

२) *सेंटर फॅार वर्क ' लाइफ या संघटनेचा अहवाल .*

३) *मराठा चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर च्या महिला उद्योजक समितीच्या सहयोगी संचालिका श्रीमती मेधा कुलकर्णी यांचे विचार .*